# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

क्र.एमपीएस/६६०४ (५६२) दि.२४.०६.२०२६

अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ५४ (३) अन्वये, राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये, **श्रीम.प्राजक्ता वर्मा,** डॉ.विपिन शर्मा, श्री.अभिजीत बांगर आणि श्री.अविनाश ढाकणे ह्यांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त हे त्यांना सोपविण्यात आलेल्या कार्यक्षेत्रासंबंधी, श्रीम.अश्विनी भिडे, महानगरपालिका आयुक्त ह्यांच्या नियंत्रणाधीन, आयुक्तांचे सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करतील आणि त्यांची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडतील.

महानगरपालिका आयुक्त आणि महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त ह्यांचे दि.२४.०६.२०२६ (मध्यान्हपूर्व) पासून कामाचे/खात्यांचे वाटप खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

१) श्रीम.अश्विनी भिडे, महानगरपालिका आयुक्त

१) धोरणात्मक बाबी व अंतरर्खात्यांचे समन्वय व सर्व खात्यांचे पर्यवेक्षणासंबंधित बाबी.

२) प्रमुख अभियंता (विकास नियोजन)

३) निधीसंबंधीच्या विशेष तरतूदी, किरकोळ अग्रीम, अर्थसंकल्पामध्ये तरतूद न केलेल्या योजना/प्रकल्प ह्याकरिता विशेष मंजुरी संबंधीच्या सर्व बाबी.

४) कोणत्याही अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त ह्यांना नेमून न दिलेले कोणतेही इतर विषय/खाती.

५) दक्षता (अभियांत्रिकी शाखा), चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी, दक्षता अधिकारी (विशेष कार्य), प्रमुख अधिकारी (चौकशी).

**२) श्रीम.प्राजक्ता वर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त** (शहर)

१) परिमंडळ १ व २ चे प्रशासन

२) सामान्य प्रशासन, कर्मचारी व कामगार विषयक प्रकरणे, जनसंपर्क, आंतरराष्ट्रीय संपर्क कक्ष, मध्यवर्ती पुराभिलेख कक्षाचे कामकाज आणि अशासकीय संस्थांसंबंधींच्या धोरणात्मक बाबी, नागरीक गट, नागरीकांची सनद इत्यादी.

३) करनिर्धारण व संकलन खाते आणि मालमत्ता कर सुधारणाबाबतची अंमलबजावणी.

**४) आरोग्य खाते, सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय शिक्षण, कोविड जम्बो सेंटर्स (सध्या सुरु असलेली व प्रस्तावित) संबंधीचे संपूर्ण कामकाज**

**५) शिक्षण खाते**

**६) प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण), उप प्रमुख अभियंता (शाळा पायाभूत सुविधा) व उप प्रमुख अभियंता (रुग्णालय पायाभूत कक्ष)**

७) निवडणूक

८) विधि खाते

९) **संचालक (नियोजन)**

१०) नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र व संचालक (एमसीएमसीआर)

११) देवनार पशुवधगृह

१२) शहरी द्रारिद्रय निर्मूलन, जिल्हा शहरी विकास संस्था व राष्ट्रीय शहरी नुतनीकरण मिशन.

१३) अतिक्रमण निर्मूलन/अनधिकृत बांधकाम हटविणे/फोटोपास देणे

१४) झोपडपट्टी वसाहतींबाबतचे प्रशासन व झोपडपट्टी वासीयांकरीता प्रधान मंत्री निधी कार्यक्रम, जुन्या इमारतींची दुरुस्ती व गृहनिर्माण प्राधिकरणांशी समन्वय व गृहनिर्माण संबंधी प्रकरणे.

१५) मोडकळीस आलेल्या इमारती संबंधीबाबी तसेच, शासनाकडील बैठकांना उपस्थित राहणे व विधानसभा/परिषद प्रश्नांची उत्तरे देणे.

१६) शासनाशी समन्वय

१७) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ बाबतचे कामकाज

१८) डॉ.भाऊ दाजी लाड संग्रहालयाचे परिरक्षण व प्रचालन.

१९) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमासंबंधीचे कामकाज

२०) दहिसर व अन्य ठिकाणांचे परिवहन केंद्रांचे प्रकल्प (Transport Hub Projects at Dahisar & other locations)

२१) गट विमा योजना

२२) उपरोक्त नमूद विषयांसंबंधीचे अनुत्तरीत ठराव, प्रश्नावली, अल्प मुदतीचे प्रश्न याबाबत पाठपुरावा करणे.

३) डॉ.विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे)

१) परिमंडळ ३, ४ व ७ चे प्रशासन

२) **घनकचरा व्यवस्थापन, गलिच्छ वस्ती स्वच्छता कार्यक्रम कक्ष आणि आश्रय योजना.**

३) क्षेपणभूमी संबंधित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प.

४) मध्यवर्ती खरेदी खात्याशी संबंधीत कामकाज

५) बाजार

६) **प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) प्रकल्प नियोजन व नियंत्रण कक्ष.**

७) **प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)**

८) **प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन)**

९) अनुज्ञापन आणि दुकाने व आस्थापना खाते.

१०) माहिती तंत्रज्ञान उपयोग व सुधारणा तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका संगणकीकरणाबाबतच्या बाबी.

११) उपरोक्त नमूद विषयांसंबंधीचे अनुत्तरीत ठराव, प्रश्नावली, अल्प मुदतीचे प्रश्न याबाबत पाठपुरावा करणे.

४) श्री.अभिजीत बांगर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)

१) प्रमुख अभियंता (मुंबई मलनि:सारण विल्हेवाट प्रकल्प) (गलिच्छ वस्ती स्वच्छता कार्यक्रम कक्ष वगळून)

२) प्रमुख लेखापाल (वित्त) व प्रमुख लेखापाल (कोषागार) ह्यांची खाती, वित्तीय सुधारणा.

३) प्रमुख लेखापाल (पाणीपुरवठा व मलनि:सारण) ह्यांच्याशी संबंधीत कामकाज.

४) जल अभियंता, प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) दिर्घकालीन (लॉंगरेंज) नियोजन कक्षासह.

५) आर्ट ॲन्ड क्राफ्ट सेंटर, लव्हग्रोव्ह उदंचन केंद्र, वरळी, ह्यांचे संबंधीचे कामकाज.

६) गोरेगांव मुलुंड लिंक रोड प्रकल्प

७) प्रमुख अभियंता (पूल)

८) प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या)

९) प्रमुख अभियंता (रस्ते), सिमेंट कॉंक्रीट रस्ते व वाहतूक

१०) पश्चिम द्रुतगती महामार्ग प्रवेश नियंत्रण प्रकल्प (WESTERN EXPRESS HIGHWAY ACCESS CONTROL PROJECT)

**११) किनारी रस्ता (उत्तर) (दि.०५.०६.२०२६ पासून)**

१२) उपरोक्त नमूद विषयांसंबंधीचे अनुत्तरीत ठराव, प्रश्नावली, अल्प मुदतीचे प्रश्न याबाबत पाठपुरावा करणे.

५) डॉ.अविनाश ढाकणे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)

१) परिमंडळ ५ व ६ चे प्रशासन

२) नगर अभियंता

३) मालमत्ता खाते - महानगरपालिकेच्या जमिनी व त्यावरील इमारती, माजी विश्वस्तांच्या चाळी, संपादित केलेल्या मालमत्तांचे व्यवस्थापन व पुनर्विकास

४) उप प्रमुख अभियंता (सुधार) ह्यांच्याशी संबंधीत कामकाज

५) उद्यान खाते, प्राणीसंग्रहालय व **मुद्रणालय**

**६) अग्निशमन खाते**

७) आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

**८) सुरक्षा खाते**

९) व्यवसाय विकास खाते.

१०) स्मार्ट शहर संबंधीत कामकाज.
एमयुटीपी, एमयुआरपी, सिडको, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, म्हाडा, इत्यादी संबंधीत कामकाज.
राजीव आवास योजना संबंधी बाबी.
मेगा शहर प्रकल्प.

११) गणेशोत्सव संबंधी बाबी.

१२) नाट्यगृहे, तरण तलाव, वाचनालय, क्रिडा संकुल आणि सदर संकुलांच्या व्यवस्थापनासाठी विश्वस्त मंडळे.

१३) सांस्कृतिक ठेव्याचे संवर्धन (गेटवे ऑफ इंडिया बाबतचा विशेष प्रकल्प आणि टेक्सटाईल म्युझियम संबंधी बाबी, इत्यादी)

१४) १०% निवास स्थान आरक्षणासहित कर्मचा-यांना निवास स्थानाचे वाटप.

१५) पर्यावरण अभियांत्रिकी संबंधीचे कामकाज

**१६) शिल्पग्राम, अंधेरी, संबंधीत कामकाज (दि.०४.०६.२०२६ पासून)**

**१७) किनारी रस्ता (दक्षिण) (दि.०५.०६.२०२६ पासून)**

१८) उपरोक्त नमूद विषयांसंबंधीचे अनुत्तरीत ठराव, प्रश्नावली, अल्प मुदतीचे प्रश्न याबाबत पाठपुरावा करणे.

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.२४.०६.२०२६ | सही/-दि.२४.०६.२०२६ | सही/-दि.२४.०६.२०२६ |
| (श्रीम.शारदा गोसावी) | (श्री.किशोर गांधी) | (श्रीम.अश्विनी भिडे) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | महानगरपालिका आयुक्त |

प्रत---------------------------------------------------------------------------------

यांच्या माहितीकरिता व पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

Ghadge २४/६/२६

सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्थापना)

२४/६/२०२६

२७/६/२६
प्रअ